
पाक्षिक प्रदेश बीजेपी

# मनोगत



१२ किल्ले युनेस्कोच्या यादीत

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 14 ● 16 जुलै 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# महाराष्ट्र धर्म









## अध्यक्षीय मनोगत

# विरोधकांचा खोटा प्रचार हाणून पाडू

**माझ्यासारख्या** सर्वसामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या कार्यकर्त्याला भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्षपद भूषवण्याची संधी दिल्याबद्दल मी सर्वप्रथम पक्षाचे आभार मानतो. भारतीय जनता पार्टीसारख्या संघटनेचे राज्य प्रमुखपद ही फार मोठी गोष्ट आहे. मला पक्षाने आजवर अनेक पदे दिली आहेत. या पदांच्या माध्यमातून जनतेची सेवा करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. माझ्या दृष्टीने सत्तेच्या पदांपेक्षा पक्षाचा कार्यकर्ता हे फार मोठे पद आहे. कारण कार्यकर्ता हे पद कोणीच हिरावू शकत नाही. आपण सर्व विचार परिवाराच्या ज्या संस्कारांत वाढलो आहोत त्या परिवारात कार्यकर्ता हे सर्वोच्च पद आहे. आपल्यासारख्या लक्षावधी कार्यकर्त्यांचे नेतृत्व करण्याची संधी संघटनेने मला दिली याबद्दल मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. आपला पक्ष हजारो कार्यकर्त्यांच्या बलिदानावर, त्यागावर उभा राहिलेला पक्ष आहे. लाखो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादाच्या विचारसरणीसाठी आपले आयुष्य समर्पित केले आहे. म्हणूनच अशा पक्षाचा प्रदेशाध्यक्ष होणे हा माझा बहुमान समजतो.

आता आपल्यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे आव्हान आहे. २०१७ च्या महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत आपण पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरलो होतो. २०१४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपासून आपण राज्यातील सर्वाधिक जागा जिंकत आलो आहोत. याला अपवाद २०२४ च्या लोकसभा निवडणुकांचा. विरोधकांनी केलेल्या खोट्या प्रचारामुळे त्या निवडणुकीत आपल्या जागा कमी झाल्याचे शल्य आपणा सर्वांच्या मनात आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटीची विधानसभा निवडणुकीत आपण सव्याज परतफेड केली आहे. मुद्दा आहे तो विरोधकांकडून होणाऱ्या खोट्या प्रचाराचा. आपले राष्ट्रीय आणि राज्यातील नेतृत्व जनतेच्या सेवेत अहोरात्र असतानाही खोट्या प्रचाराचे आपण बळी ठरलो. माझे कार्यकर्त्यांना एकच सांगणे आहे की, केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सामान्य माणसाच्या कल्याणासाठी असंख्य योजनांतून काम करीत आहे. ही सगळी कामे आणि आपल्या पक्षाची राष्ट्रवादाची विचारधारा सामान्य जनतेपर्यंत पोहचवायची आहे. पक्षाने दिलेले सर्व कार्यक्रम आपण सर्वजण उत्साहात राबवित आहात, याची मला कल्पना आहे. आता आपल्याला आणखी जोमाने काम करून आपल्या सरकारची कामे तळागाळातील जनतेपर्यंत नेऊन विरोधकांचा खोटा प्रचार हाणून पाडायचा आहे. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक जागा मिळावायचा निर्धार आपल्याला करायचा आहे. एवढेच ध्येय ठेवून आपण पक्षासाठी वेळ द्यायचा आहे.

*हास्य-रूदन में, तूफानों में, अमर असंख्यक बलिदानों में,*
*उद्यानों में, वीरानों में, अपमानों में, सम्मानों में,*
*उन्नत मस्तक, उभरा सीना, पीड़ाओं में पलना होगा, कदम मिलाकर चलना होगा।*

**आपल्या सर्वांचे आदर्श असलेल्या अटलजींनी राष्ट्र कार्यासाठी झोकून देण्याचा आदेश, या काव्य पंक्तींतून दिला आहे. त्याप्रमाणे आपण सर्व कामाला लागू.**

**रवींद्र चव्हाण**

# अंतरंग





**महाराष्ट्र धर्म.. थांबलाच नाही.. साखळी कधी तुटली नाही...!** ०४



**आरोग्य सेवेची वारी...** ०९



**वारी पंढरीची.. वारी सेवेची..** १४



**शिवरायांचे 12 किल्ले युनेस्कोच्या यादीत** १६



**संघटनाशरण नेतृत्व** १८



**'सरकार आपल्या दारी' ची कल्पना प्रत्यक्षात आणणारा उपक्रम** २३






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# महाराष्ट्र धर्म.. थांबलाच नाही.. साखळी कधी तुटली नाही...!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'महाराष्ट्र धर्म' विशेष पॉडकास्टचा प्रारंभ



> ज्ञानेश्वरांच्या ओव्यांपासून, शिवरायांच्या तलवारीपर्यंत, महात्मा फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत...

**'महाराष्ट्राचा** इतिहास गौरवशाली आहे. आणि ती एक जबाबदारी देखील आहे. आपण ज्ञानेश्वरांचे, शिवरायांचे, क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थेट वशंज नसलो, तरीही विचारांच्या वारश्याचे वाहक आहोत. या सर्वांनी आपल्या ज्ञानाने, त्यागाने आणि धैर्याने हे राज्य घडविले. त्याला जपणे, वाढवणे आणि पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्र धर्म म्हणजे स्मरण रंजन नाही. तो आपला नैतिक मार्गदर्शक. आपण कोण आहोत, हे समजून घेऊन, आपल्याला काय घडवायचे आहे, ते ठरविणे, हाच महाराष्ट्र धर्म आहे,' अशी मांडणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजपासून 'महाराष्ट्र धर्म' विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला. ही मुलाखत सुप्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक-लेखक आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे वंशज डॉ. सदानंद मोरे यांनी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते १९ या आपल्या पहिल्या कार्यकाळात 'मी मुख्यमंत्री बोलतोय' हा टीव्ही शो केला होता. आता नवमाध्यमात लोकप्रिय अशा पॉडकास्टच्या माध्यमातून ते जनसंवाद साधणार आहेत.

**पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ 'महाराष्ट्र धर्म** पायाभरणी आणि उभारणी' या विषयापासून झाला. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आलेल्या



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्र धर्माचे आदर्श आहेत.

'महाराष्ट्र धर्म' या विशेष पॉडकास्ट मालिकेचे हे पहिले चरण होते. यात रामायणापासून ते महाभारतापर्यंत, जगाला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवणाऱ्या गौतम बुद्धांपासून ते भक्ती संप्रदायाच्या संतांपर्यंत आणि महाराष्ट्राची अध्यात्मिक पायाभरणी आणि उभारणी या विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समाज माध्यमावरून हे पॉडकास्ट करण्यात येत आहे. या पहिल्याच पॉडकास्टमध्ये सहभागी झालेल्या श्रोत्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले आहेत. तसेच यापुढेही महाराष्ट्राच्या इतिहासात, संस्कृतीमध्ये, साहित्यामध्ये देवभूमी, संतभूमी, वीरभूमी म्हणून विचार आहे. या सर्वांचा धांडोळा घेतानाच, महाराष्ट्र हा महाराष्ट्र का आहे, याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न राहणार असल्याचेही म्हटले आहे.

आजच्या पहिल्याच पॉडकास्टमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राची पायाभरणी आणि उभारणीच्या अनुषंगाने मांडणी केली. 'महाराष्ट्र धर्म हा धर्म नाही. ती आहे, एक जीवंत मुल्य संहिता. ती सांगते विवेकाने विचार करा. सेवाभावाने वागा आणि शौर्याने उभे राहा. ज्ञानेश्वरांच्या ओव्यापासून शिवरायांच्या तलवारीपर्यंत फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत ही साखळी कधी तुटलीच नाही. ती सतत पुढे सरकत राहिली,' अशा मांडणीमुळे पॉडकास्टचा प्रारंभ अभ्यासपूर्ण आणि उत्कंठावर्धक झाला. त्याला मोठा प्रतिसादही लाभला.

### महाराष्ट्राची कहाणी सुरु होते देवांच्या पावलांनी

महाराष्ट्राची कहाणी सुरु होते, ते देवांच्या पावलांनी. रामायणात याचा उल्लेख आहे. राम वनवासात होते. त्यावेळी ज्या दंडकारण्याचा उल्लेख येतो. ते दंडकारण्य विदर्भ ते नाशिक-पंचवटी पर्यंत विस्तारले आहे. महाभारतात सुद्धा महाराष्ट्राची भूमी आहे. विदर्भात दमयंतीची गोष्ट घडली. कोकणातील गुहांमध्ये अर्जून धान्यस्थ बसले होते, असे लोककथांमध्ये सांगितले जाते. महाभारतातल्या रमणीय कथेचा भाग घडतो, तोही विदर्भातच. रुक्मिणीचे कौंडीण्यपूर आणि तिथून तिची भगवान श्रीकृष्णांनी केलेली सूटका, त्यासाठीचे युद्ध




पंढरीतील विठ्ठरायाच्या दर्शनासाठी लाखो वारकऱ्यांचा सहभाग असलेला पालखी सोहळा हे महाराष्ट्र धर्माचे वैभव आहे.

देखील या विदर्भाच्याच भूमित घडले. पांडव अज्ञातवासात राहीले, ते चिखलदऱ्यात. किचकाची जुलमी राजवट पांडवानी उधळून लावली. सत्याने असत्यावर मिळवलेल्या विजयाची ही रोमहर्षक कहाणी आहे. महाराष्ट्राची भूमी पुराणांमध्येही आहे.

भगवान गौतम बुद्ध हे महाराष्ट्राच्या भूमीत शांततेचा संदेशाच्या रुपाने इथे पोहोचले. त्यांचे शब्द संदेश लोकांनी शांतपणे आत्मसात केले. ते शब्द जपले. अजिंठ्याच्या शांत डोंगररांगामध्ये भिक्खुंनी त्यांच्या कथा दगडात कोरल्या. जगाला दुःखातून मुक्त होण्याचा ज्यांनी मार्ग दाखवला त्या भगवान गौतम बुद्धांचे शब्द महाराष्ट्राने फक्त ऐकले नाहीत. त्यांना गुफांमध्ये, स्मृतीमध्ये आणि आत्म्यातही जपले. महाराष्ट्रातील दैवी ऊर्जेमुळे इथे सत्याचा, विश्वाचा शोध घेणारे साधक, संत, विचारवंत इथे आले आणि रमले. शंकराचार्यांनी भारतभर भ्रमण केले. त्यांनी त्यांचे एक महत्वाचे पीठ करवीर पीठाच्या रुपाने स्थापन केले. इथे साक्षात महालक्ष्मीचा निवास आहे. महाराष्ट्र हा उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा दूवा आहे.

### पंढरीची वारी चालती-बोलती संस्कृती

इथल्या मातीनेच बोलायला सुरुवात केली, ती संतांच्या रुपाने. तेराव्या शतकात चक्रधर स्वामींनी स्थापन केलेला महानुभव पंथ जाती-पातींना नाकारणारा आहे. त्यांनी साध्या-सोप्या भाषेत शिकवण दिली. नंतरच्या काळात नम्रता आणि श्रद्धा यावर आधारलेली वारीची परंपरा आली. जगात क्वचितच अशी यात्रा असेल. जी सामाजिक समतेचा झरा बनली आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी दिली. पसायदान ही जागतिक संस्कृतीतील सर्वोत्तम प्रार्थना आहे. निवृत्तीनाथांनी नाथ संप्रदायाची सुरुवात केली. मुक्ताईंच्या ओव्या तर मंत्रमुग्ध करणाऱ्या आहेत. संत नामदेवांच्या विचारांना गुरू ग्रंथसाहिबमध्येही स्थान आहे. पंजाबमध्ये आपण घुमान येथे साहित्य संमेलन घेतले. पंजाबमध्ये संत नामदेव यांच्याविषयी मोठा आदर, भक्तीभाव पाहायला मिळाला. संत एकनाथ, संत चोखोबा, त्यांच्या पत्नी सोयराबाई असे सर्व संत हे केवळ उपदेशक नव्हते, ते भक्तीचे लोकशाहीकरण करणारे, शस्त्र हाती न घेणारे योद्धे होते. आपली वारीची परंपरा ही चालती-बोलती संस्कृती आहे. एक अखंड स्मृती आहे, जी महाराष्ट्राचे आत्मभिमान जपते आहे. हजारो वर्षांपूर्वी परकीय आक्रमणाला न जुमानता, जिझिया कराचा जाच न बाळगता चालत राहीली. वारी न इस्लामी राजवटीत



विठु माझा लेकुरवाळा... विठ्ठलाच्या भक्तीत दंग झालेल्या संतांनी महाराष्ट्राला नव्हे तर देशाला समानतेची, सहिष्णुतेची शिकवण दिली.

थांबली, न इंग्रजी आक्रमणात. हजारो दिंड्या या वारीत सहभागी होतात. यंदाही या वारीत देश-विदेशातून लोक सहभागी झाले आहेत. यावर्षी काहींनी या वारीत आर्टिफिशियल इंटेलिजन्सचाही वापर सुरु केला आहे. हा पंढरीचा महिमा थक्क करणारा आहे.

### ..मराठा तलवार यमुनेपर्यंत पोहोचली

छत्रपती शिवाजी महाराज हे ध्येयाकरिता लढले. ते सत्तेकरिता लढले नाहीत. ते देव-देश आणि धर्माकरिता लढले. या वीर योद्ध्यांची तलवार धर्माच्या मार्गावरच चालणारी होती. त्यांचे युद्ध हे जिंकण्यासाठी नव्हते. ते चरित्र जपण्यासाठी होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य राजवाड्यातील जड-जवाहिरातून नव्हे, तर आईच्या गोष्टींतून साकारले. राजमाता जिजाऊंच्या स्वप्नांनी त्यांचे मन घडवले. छत्रपती शहाजीराजेची स्वराज्य संकल्पना त्यांनी साकारली. त्यांचा राज्यकारभार नैतिकतेवर आधारलेला होता.

सर्व धर्मांबद्दल आदर, मंदिर-मशिद तोडण्यास बंदी, स्त्रियांचा हे सगळे त्याकाळाच्या पुढे होते. जगात असा राजा कुठे झालेला नाही. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज यांनीही कवी, योद्धा आणि विद्वान म्हणून स्वराज्य आणि धर्माचे रक्षण केले. प्रसंगी त्यासाठी बलिदान दिले. त्यानंतर थोरले बाजीराव पेशवे यांनीही असाच पराक्रम गाजवला. त्यांना घोड्यावरून येणारे वादळ म्हटले जायचे. आयुष्यात ते एकही लढाई हरले नाहीत. बाजीराव हे छत्रपतींचे सेनापती नव्हते, ते संस्कृतीचे द्रष्टे शिल्पकार होते. त्यानंतर योद्धे म्हणून महादजी शिंदे यांनी राखेतून मराठी साम्राज्य उभे केले. त्यांनी दिल्ली पुन्हा मराठ्यांच्या हातात दिली. शिंदे, होळकर, भोसले या मराठी माणसांनी संपूर्ण भारताचा कारभार हाती घेतला. ब्रिटीश, अफगाणांशी मुत्सद्दीपणे त्यांनी वाटाघाटी केल्या. मराठी अस्मिता जपली. राजकारणात मुत्सद्देगिरी जपली, त्याचे अधिष्ठान होते, संस्कृतीचा अभिमान. त्यांच्यामुळेच मराठा तलवार यमुनेपर्यंत पोहचली, आणि भारताच्या केंद्रस्थानी मराठा साम्राज्य पुन्हा प्रस्थापित झाले.

### धैर्यशाली नारिशक्ती..


इथल्या धैर्यशाली स्त्रियांनाही विसरून चालणार नाही. जेव्हा साम्राज्य संकटात होते, त्यावेळी राजाराम महाराजांच्या पत्नी ताराबाई तलवार घेऊन उभ्या राहिल्या. त्यांनी औरंगजेबाला वर्षानुवर्षे थोपवून धरले. संताजी जाधव-धनाजी घोरपडेंच्या काळात इथे गवतालाही पाते फुटले. पहिल्या सेनापती उमाबाई दाभाडे यांनी नेतृत्व केले. रणनिती आखली. त्याकाळात स्त्रियांना बोलण्याची संधी नसायची, अशा काळात पुण्यश्लोक अहिल्यादेवी या भारतीय संस्कृतीतील नारीशक्तीच्या प्रतिक ठरल्या.

### महाराष्ट्र धर्म..थांबलाच नाही..
### साखळी कधी तुटलीच नाही!

महाराष्ट्राने केवळ योद्धे निर्माण केले नाहीत, तर त्यांनी



छत्रपती शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यासाठी अखंड लढा दिला.



थोरले बाजीराव पेशवे यांनी मराठा साम्राज्य देशभर विस्तारले.

घडवले धर्माचे रक्षक, राष्ट्राच्या संकल्पनेचे उद्गाते आणि नव्या भारताचे शिल्पकार. महाराष्ट्र धर्म कधी थांबलाच नाही. पण तो बदलत गेला. काळानुसार त्यांनी स्वरूप बदलले पण आत्मा कधीच बदलला नाही. महात्मा जोतिबा फुले यांनी जात, पितृसत्ता आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. धर्माच्या नावाने होणाऱ्या विषमतेला उघडपणे विरोध केला. त्यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षणासाठी सोसलेल्या धैर्याची परिभाषाच घालून दिली. लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्राला राजकीय गर्जना दिली. त्यांनी गणेशोत्सव, वृत्तपत्रे या मार्गांनी त्यांनी परंपरेलाच प्रतिकारचे हत्यार बनविले. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच ही केवळ घोषणा नव्हती, ती होती एक जनचळवळ. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विरोध, अपमान, भेदभाव यावर बुद्धी आणि अभ्यासाने विजय मिळविला. कोलंबियामधून शिक्षण घेऊन आलेले डॉ. बाबासाहेब भारताच्या संविधानाचे शिल्पकार झाले. महाड सत्याग्रह, शिक्षणाचा आग्रह आणि जात व्यवस्थेच्या निर्मुलनाचा निर्धार हे सगळे संघर्ष नव्हते, तर नव्या भारताचे नैतिक बांधणी. याच मालिकेत पंडिता रमाबाईंनी विधवा महिलांकरिता शिक्षण आणि अधिकारांची चळवळ उभी केली. गोपाळ गणेश आगरकर यांनी रुढी आणि कर्मकांड यांना थेट प्रश्न विचारले. संत गाडगेबाबा सामाजिक स्वच्छता आणि अंतःकरणातील शुद्धतेचे सुंदर नाते जगासमोर आणले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह, शाळा उभ्या केल्या. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला उभे केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून ग्रामीण भागातल्या महाराष्ट्राला जीवन शिकवले. म्हणूनच महाराष्ट्र धर्म हा धर्म नाही. ती आहे, एक जीवंत मुल्य संहिता. ती सांगते विवेकाने विचार करा.

सेवाभावाने वागा, आणि शौर्याने उभे राहा. ज्ञानेश्वरांच्या ओव्यापासून शिवरायांच्या तलवारीपर्यंत फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत ही साखळी कधी तुटलीच नाही. ती सतत पुढे सरकत राहीली. रिद्धपूर हे चक्रधर स्वामींच्या गुरूंचे गोविंदप्रभूंचे क्षेत्र.

महाराष्ट्र शासनाने येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन केले आहे. याच रिद्धपूरमध्ये मराठी भाषेतील अनेक ग्रंथ तयार झाले. काही दिवसांपूर्वी या विद्यापीठाने आपले कामकाज देखील सुरु केले आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ■

# आरोग्य सेवेची वारी...

आषाढी यात्रा ही धार्मिक यात्रा नसून सामाजिक सलोखा, शिस्त आणि एकात्मतेचे मूर्त स्वरूप आहे. या यात्रेला यंदा २० लाखांहूनही अधिक भाविक आले होते. अशा या यात्रेत भाविकांच्या सेवेचा अनोखा उपक्रम मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाने यशस्वीरित्या राबविला.



**यावर्षीची** आषाढी यात्रा उत्कृष्ट नियोजनामुळे तसेच चरण सेवेसारख्या उपक्रमामुळे भाविकांच्या आठवणीत राहिल. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेतृत्वाखाली २०२४ मध्ये आषाढी वारीत स्वच्छतेला अधिक प्राधान्य देऊन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्याने वारकरी, भाविक यांना चांगल्या सुविधा मिळाल्या होत्या. गेल्या वर्षीच्या वारीच्या अनुभवावर पालखी, दिंडया, पालखी महामार्ग, वाखरी पालखी तळ, ६५ एकर व पंढरपूर शहर या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटल्याने जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आषाढी वारी २०२५ मध्ये त्या अनुषंगाने नियोजनबद्ध निर्णय घेऊन त्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली व ती अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे की नाही याची खात्रीही स्वतः फिल्डवर जाऊन केली. यावेळी गर्दीच्या ठिकाणी जाताना भाविकांना त्रास होऊ नये, यासाठी त्यांनी पायी जाणे, बाईकवर जाऊन देखरेख व नियंत्रण ठेवले. त्यामुळे वारकरी भाविकांना अधिक चांगल्या व वेळेत सुविधा देण्याची व्यवस्था अधिक तत्परतेने झाली.

संपूर्ण राज्यभरातून आषाढी एकादशीला श्री. क्षेत्र पंढरपूरला विविध संतांच्या पालख्या दिंडीसह नेण्याची परंपरा वर्षानुवर्षांपासून आहे. वारीत, विविध ठिकाणांहून वारकरी पायी पंढरपूरला जातात त्यामुळे वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी सुयोग्य वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात व दिवसभराच्या पायी चालण्यामुळे आलेला थकवा दूर व्हावा याकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून दिंडीच्या मार्गावर चरणसेवा उपक्रम राबविण्यात आला.

चरण सेवा उपक्रमातंर्गत प्रत्यक्षात १.७५ लाखापेक्षा जास्त वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा व शास्त्रोक्त पध्दतीचे भौतिकोपचार (Physiotherapy) पंचकर्म उपचार पध्दतीने मसाज देण्यात आले. त्याचप्रमाणे १० लाखापेक्षा जास्त लोकांपर्यंत मुख्यमंत्री सहायता योजना व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष संबंधी माहीती आणि राज्य तथा केंद्र शासन पुरस्कृत योजनासंदर्भातील माहीती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आली.

### 'चरणसेवा' - ठळक वैशिष्ट्ये

१ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरणसेवा, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत विविध आरोग्य




**सातारा जिल्ह्यातील लोणंद येथे उभारण्यात आलेले वारकरी सहाय्यता केंद्र**

योजनांबाबत माहिती पोहोचविण्यात आली.

● पालखी मार्गावर ३३७ ठिकाणी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

● या सेवा उपक्रमात २१९ आरोग्य संस्थांचा सहभाग होता.

● चरण सेवेसाठी २ हजार लिटर आयुर्वेदिक अभ्यंग तेलाचा वापर करण्यात आला.

● पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवेचा लाभ देण्यात आला.

● जिजाऊ फाऊंडेशनमार्फत वारकऱ्यांसाठी १६७ बस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

● पालखी मार्गावर १० रथांच्या माध्यमातून आरोग्य जनजागृतीचे काम करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या मदतीची माहिती देण्यात आली.

● केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती ही या माध्यमातून देण्यात आली.

● या संपूर्ण उपक्रमात एकूण ९ हजार ४७५ कर्मचारी व स्वयंसेवकांचा थेट सहभाग होता.

● वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल व नर्सिंग विद्यार्थी, फिजिओथेरपी प्राध्यापक व विद्यार्थी तसेच विविध सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी यांचा सहभाग होता.

● ७ जिल्ह्यांचा सक्रीय सहभाग: सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, जालना, बीड, धाराशिव.

● योग व आरोग्य जनजागृती–सोलापूर जिल्ह्यात पालखी मार्गावर ७ ठिकाणी योगसत्रांचे आयोजन करण्यात आले.

● चरणसेवा उपक्रमाचा खर्च हा पूर्णपणे लोकसहभागातून करण्यात आला. लोकसहभागातून सुमारे १ कोटी ६३ लाख ५००० रूपये एवढा निधी उभारण्यात आला.

महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ, नाशिक, महाराष्ट्र राज्य होमियोपॅथी कौन्सिल, फिजीओथेरपी कौन्सिल, नर्सिंग कौन्सिल, अनुलोम, सेवाभारती, सेवांकुर, आरोग्य भारती, जिज्ञासा, आखिल भारतीय विद्यार्थी परिषद, तथा विविध सेवाभावी संस्थाकडून डॉक्टर्स, स्वयंसेवक यांच्या सेवा सेवाभावी तत्वावर निशुल्क स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

### गर्दीचे रेकॉर्ड

आषाढी वारी २०२५ मध्ये प्रशासनाने अनुमान



पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी जर्मन हँगर्सची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. वारकऱ्यांच्या पायाला मसाज करण्यासाठीही संपूर्ण पालखी मार्गावर अनेक स्वयंसेवकांच्या सहभागातून व्यवस्था उभी राहिली होती.





लावल्याप्रमाणे २० ते २२ लाख भावीक पंढरपूरमध्ये दाखल झालेले होते. कारण यावर्षी पाऊस वेळेपूर्वी झालेला होता व शेतकरी वर्गाच्या बहुतांश पेरण्याही पूर्ण झालेल्या होत्या. त्यामुळे वारीला मोठी गर्दी होईल, याची अपेक्षा प्रशासनाने केलेली होती व त्यानुसारच नियोजनही केलेले होते. विठ्ठल रुक्मिणीच्या पददर्शनाची रांग गोपाळपुराच्या पुढे गेलेली होती. ही रांग आणखी खूप पुढे जाण्याची शक्यता होती. एक तर पंढरपूरमध्ये आलेल्या भाविकांना दर्शन रांगेत पोहोचण्यासाठी ७-८ किलोमीटर प्रवास करावा लागत होता. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पुढाकार घेऊन गोपाळपूरच्याजवळ हॉटेल आसरा समोर एक जर्मन हंगर टेन्ट व तिथून सातशे मीटर अंतरावर एका शेतकऱ्याच्या शेतात दुसरा जर्मन हंगर टेन्ट रातोरात उभा करून घेतला. पहिल्या टेन्टमध्ये दीड किलोमीटरची रांग तर दुसऱ्या टेन्टमध्ये अडीच किलोमीटरची दर्शन रांग ॲडजस्ट करण्यात आली. तसेच दर्शन रांगेत देण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधा त्यांच्या



बाहेर एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या तसेच पोलिसांनाही या ठिकाणी नियंत्रण ठेवणे शक्य झाले. भाविकांनाही याचा खूप मोठा लाभ झाला. जवळपास ४ किलोमीटरच्या दर्शन रांगेचे टेंटच्या माध्यमातून व्यवस्थापन करण्यात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

### पालखी मार्ग स्वच्छता

पालखी मार्ग, पंढरपूर शहर वाखरी तळ तसेच ६५ एकर या भागात मोबाईल टॉयलेट वारकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आलेले होते. या टॉयलेटची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी सफाई कर्मचारी, पाण्याची व्यवस्था उपलब्ध केलेली होती. तसेच वारी कालावधीत पालखी मार्ग पंढरपूर शहरात कोणत्याही प्रकारची अस्वच्छता निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः पुढाकार घेऊन सफाई कर्मचाऱ्यांचे सुपरवायझर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या तीन ते चार बैठका घेतल्या. यात त्यांना त्या-त्या भागातील शौचालयाचे नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. या माध्यमातून सुपरवायझरवर नियंत्रण निर्माण करून त्याच्यामार्फत सफाई कर्मचाऱ्याकडून टॉयलेटची स्वच्छता राबवली गेली. जर कोठेही अस्वच्छता राहिली तर संबंधित भागाचे सुपरवायझरवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आलेले होते. त्यामुळे सुपरवायझर यांनी संबंधित सफाई कर्मचारी यांच्याकडून टॉयलेटची स्वच्छता उत्तम प्रकारे करून घेतली व संपूर्ण पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावर खूप चांगली स्वच्छता राहिली, यात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केलेले सूक्ष्म नियोजन खूप महत्वपूर्ण ठरले.

### आपत्ती व्यवस्थापन

गर्दीच्या योग्य नियंत्रणाच्या अनुषंगाने १३ हॉटस्पॉट शोधले व प्रत्येक हॉटस्पॉटवर पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले तसेच पोलीस टीम सोबत या ठिकाणी एक आयसीयु कक्ष निर्माण करण्यात आला. या स्पॉटवर कोणतीही अनुचित घटना होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही केली जात होती.

### महिलांसाठी विशेष सुविधा

सर्व पालखी मार्ग, पालखी तळ, वाळवंट, वाखरी तसेच ६५ एकर व पंढरपूर शहरात महिलांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या. महिलांसाठी स्वतंत्र २२५० स्नानगृहे उपलब्ध केलेली होती. जिल्ह्यात १५५ अहिल्यादेवी होळकर हिरकणी कक्ष निर्माण केले होते. या अंतर्गत स्तनदामाता साठी विशेष सुविधा उपलब्ध केली होती. त्याच ठिकाणी महिलांसाठी मोफत सॅनिटरी पॅडची व्यवस्था करून प्रत्येक हिरकणी

कक्षामध्ये आरोग्य सेविका यांची नियुक्ती केलेले होते. या प्रकारे जिल्हा प्रशासनाने संपूर्ण वारी कालावधीत महिलांना विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.

### वाखरी ते पंढरपूर महामार्गाची दुरुस्ती

वाखरी ते पंढरपूर या पाच किलोमीटर रस्त्याचे काम अपूर्ण होते. या महामार्गाच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांच्या समवेत चार ते पाच वेळा पाहणी केली. त्यातून ३५ पॅच शोधण्यात आले. या सर्व पॅचची दुरुस्ती करणे, मुरमीकरण करणे, स्लोप देण्याचे काम करणे आदी कामावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी लक्ष ठेवून ही कामे यंत्रणांकडून करून घेतली. या पूर्ण कामामुळे वारी कालावधीत वारकरी, भाविक यांना त्रास व अपघात होणार नाही याची खबरदारी घेतली.

### व्हीआयपी दर्शन बंद करणारे पहिलेच जिल्हाधिकारी

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पद दर्शनासाठी वारकरी सर्वसामान्य भाविक मोठ्या प्रमाणावर दर्शन रांगेत किमान १५- १६ तास उभे राहतात. तसेच व्हीआयपी दर्शनामुळे हा कालावधी अधिक वाढू शकतो याचा अनुभव मागील वारी कालावधीत आलेला होता. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा खूप मोठा व धाडसी निर्णय सर्वसामान्य भाविकांसाठी घेतला. व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेणारे ते पहिलेच जिल्हाधिकारी ठरले. या निर्णयामुळे भाविकांमध्ये आनंदी वातावरण झाले तसेच पदस्पर्श दर्शनाचा कालावधी किमान पाच ते सहा तासांनी कमीही झाला. त्यामुळे दर्शन रांगेत उभा राहणाऱ्या लाखो भाविकांना याचा फायदा झाला.

### पंढरपुरातील अतिक्रमणे काढली

आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने पंढरपूर शहरात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी वीस लाखापेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता प्रशासनाने गृहीत धरली होती, त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पंढरपूर शहरातील सर्व रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याबाबत उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व पंढरपूर नगरपरिषद यांना निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने शहरातील सर्व अतिक्रमणे काढून रस्ते मोकळे व प्रशस्त करण्यात आले होते. त्यामुळे भाविकांना अतिक्रमणाचा कोणताही त्रास होणार नाही व गर्दीवर नियंत्रणासाठी ही हा निर्णय महत्वपूर्ण ठरला.

### नो व्हेईकल झोन

अति महत्त्वाच्या व्यक्तींची वाहने थेट मंदिरापर्यंत येत होती. त्यामुळे सर्वसामान्य भाविक वारकऱ्यांना खूप त्रास होत होता. तसेच चौपाड ते मंदिर या रस्त्यावर खूप मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने अनुचित घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नव्हती. त्यामुळे चौपाड ते मंदिर हा रस्ता नो व्हेइकल झोन करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढले. त्यामुळे मंदिर प्रदक्षिणा तसेच दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भाविकांना याचा फायदा झाला तसेच पोलीस प्रशासनावरील ताणही कमी झाला. या निर्णयाचे वारकरी संप्रदाय व नागरिकांनी कौतुक केले.

### गॅस सिलेंडरचा पुरवठा

जिल्ह्यात पालखी मार्गावर वाखरी पालखी तसेच ६५ एकर या भागात मुक्कामी थांबणाऱ्या वारकऱ्यांसाठी प्रशासनाच्या वतीने गॅस सिलेंडरचा पुरवठा केला. सर्व संबंधित गॅस एजन्सीची बैठक घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या. प्रत्येक गॅसवर ग्रीन स्टिकर अनिवार्य करण्यात आले. सिलेंडर वापरण्यास योग्य असल्याचे प्रमाणपत्र गॅस एजन्सी करून घेतले. गॅस लिकेजमुळे अनुचित घटना न घडण्यासाठी खबरदारी घेतली.

### वाखरी पालखी तळ

वाखरी पालखीतळ हा सर्व मानांच्या पालखीसाठी महत्त्वाचा तळ आहे. या ठिकाणी सर्व मानाच्या पालख्या मुक्कामी असतात. त्यामुळे या पालखी तळावर सर्व प्रकारच्या सोयी सुविधा चांगल्या असाव्यात यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद व जि.प. सीईओ कुलदीप जंगम यांनी स्वतः लक्ष घालून सुविधांची खात्री केली. या पालखीतळावर अंतर्गत रस्ते यासाठी एक कोटीचा निधी वापरेला. पाऊस आला तर या ठिकाणी चिखल होणार नाही, या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण केली तसेच आवश्यक तेवढे मोबाईल टॉयलेट उपलब्ध केले. ■

# वारी पंढरीची.. वारी सेवेची..

देवेंद्र फडणवीस संपूर्ण बहुमतासह दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर प्रथमच आषाढी एकादशी निमित्ताने महापूजेसाठी पंढरपुरात यावेळी येणार होते, ज्याप्रमाणे देवेंद्र २.० मध्ये प्रशासनात, कारभारात आमुलाग्र बदल आपण पाहत आहोत, त्याच पद्धतीचा बदल पंढरपूरातील व्यवस्थेत यावर्षी वारकऱ्यांना पाहायला मिळाला.

**शासनाच्या** विविध उपक्रमांच्या माध्यमातून वारकऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन यावेळी अधिक सज्ज दिसून आले. आरोग्याची, स्वच्छतेची, आपत्कालीन व्यवस्थेची सर्व तयारी प्रशासनाने काटेकोरपणे केलेली सर्वांनी पाहिली.वारकऱ्यांच्या आध्यात्मिक परंपरेस कुठलीही बाधा येऊ नये, श्रद्धेमध्ये कुठेही आपत्ती निर्माण होऊ नये या करिता अहोरात्र झटणारे मंत्री देखील या निमित्ताने वारकऱ्यांनी पाहिले.

यावर्षी आषाढी एकादशीनिमित्त मागील अनेक वर्षांचा गर्दीचा उच्चांक मोडीत काढला. सुमारे २२ ते २४ लाख वारकरी भक्त यावेळी पंढरीनाथाच्या दर्शनासाठी पंढरपुरात आले. अशा अफाट गर्दीच्या प्रसंगी कुठलीही अनुचित घटना घडू नये, वारीच्या उत्साहाला कुठलेही गालबोट लागू नये यासाठी वारकऱ्यांसोबत संमिश्र होऊन सर्वसामान्य कार्यकर्त्याप्रमाणे राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन नियोजन करीत होते. ते परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. आदल्या दिवशी महापूजेच्या तयारी संदर्भात व तासनतास पांडुरंगाच्या दर्शनासाठी रांगेत उभे असलेल्या वारकऱ्यांना दर्शन सुलभ होण्याकरिता श्री. महाजन हे प्रयत्न करतांना अनेकांनी पाहिले.



**उपक्रमात नव्हे तर वारकऱ्यांच्या सेवेत व्यस्त**

आषाढीच्या निमित्ताने अनेक विभागाचे विविध उपक्रम पंढरपुरात राबवण्यात आले यामध्ये स्वच्छतेची निर्मल वारी, आरोग्य वारी, कृषी विभागाचे कृषी प्रदर्शन आदी अनेक शासकीय उपक्रम राबविण्यात आले. परंतु या कार्यक्रमांना उपस्थित न राहता वारकऱ्यांच्या सोयीसाठी, देखभालीसाठी श्री. महाजन व्यस्त होते. आषाढी एकादशीच्या तीन दिवस आधी पंढरपुरात येऊन तळ ठोकलेल्या श्री. महाजन यांनी वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालयांची व्यवस्था, त्यांच्या थांबण्याची व्यवस्था इत्यादींची प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. पांडुरंगाच्या मुखदर्शनात कुठलीही बाधा न येता सलगतेने ते सुरू राहावे यासाठी नियोजन केले. आषाढीच्या आदल्या दिवशी सकाळपासून प्रशासनासोबत वाखरी येथील रिंगण व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था तसेच पंढरपुरातील रस्त्यांवरील स्वच्छतेचा, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा, रस्त्यावरील लाईट व साऊंड सिस्टिम व्यवस्थित सुरू आहे याचा आढावा स्थानिक प्रशासनासोबत प्रत्यक्ष पाहणी करून घेतला. चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये उभारण्यात



आलेले आरोग्य कक्ष, शौचालय, तेथे उपलब्ध पाणी, पिण्याचे पाणी याची पाहणी करुन असलेल्या त्रुटी प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्या.

### महापूजा वेळी गाभाऱ्यात असून व्यवस्थेत मग्न मंत्री

आषाढीच्या महापूजे निमित्ताने श्री. महाजन यांनी रात्रीच मुख्यमंत्री महोदयांची शासकीय विश्रामगृहात भेट घेतली व तेथून मंदिरात जाऊन थांबले. महापूजेच्या वेळी तासन्तास लाईनीत उभे राहिलेल्या वारकऱ्यांना पंढरीनाथाचे दर्शन व्हावे, याकरिता कुठलीही बाधा येणार नाही, अशी रचना श्री. महाजन यांनी प्रशासनासोबत आखली व याकरिता गाभाऱ्यात महापूजेच्या ठिकाणी न थांबता मंदिर परिसरात वारकऱ्यांना दर्शनाची व्यवस्थेसाठी प्रयत्न करीत होते. त्या संपूर्ण तीन चार तासाच्या कालावधीमध्ये ते मुखदर्शनाच्या रांगेच्या ठिकाणी व्यस्त होते.

### महापूजा आटोपल्यानंतरही गर्दी नियंत्रणासाठी पंढरपुरात तळ

महापूजेचा कार्यक्रम साधारण पहाटे साडेतीन चार वाजता पूर्ण झाला. आरतीनंतर प्रशासकीय कार्यक्रम झाला, लाखो भाविक बाहेर पांडुरंगाचे दर्शनासाठी उत्सुक होते. वारकरी मंदिराच्या दिशेने चंद्रभागेतील स्नान आटपून येत होते, तसेच विविध पालख्या वाखरीकडून महाद्वार चौकातून पुढे जात होत्या, दर्शन आटोपलेले वारकरी देखील प्रदक्षिणा पूर्ण करून महाद्वार चौकाकडून पुढे जात होते. अशामुळे प्रचंड गर्दी महाद्वार चौक परिसरात होत होती. त्यामुळे श्री. महाजन यांनी सरळ महाद्वार चौकातील पोलीस चौकी लगतच्या सुरक्षा मनोरा येथे उभे राहून पहाटे पाच वाजेपासून गर्दी नियंत्रणास सुरुवात केली. अशा गर्दीच्यावेळी वारकऱ्यांमध्ये विठू माऊलीच्या दर्शनाचा उत्साह वाढवण्याकरिता त्यांच्यासोबत सातत्याने विठ्ठल नामाच्या जय घोष मंत्री महोदय करीत होते. मनोऱ्यावरून अत्यंत बारकाईने गर्दीतील प्रत्येक व्यक्तीला आवश्यक सूचना देण्याचा प्रयत्न त्यांनी पोलीस प्रशासनासोबत केला. आदल्या दिवशी रात्रीपासून व्यवस्थेसाठी लागलेले नामदार महाजन हे संध्याकाळी पाच वाजता गर्दी अंशतः कमी झाल्यानंतर सुरक्षा मनोऱ्यावरुन खाली उतरले. आपल्या फिटनेसबद्दल प्रसिद्ध असलेल्या श्री. महाजन यांनी आपण फिट असल्याचा प्रत्यय या निमित्ताने सर्वांना दिला. यादरम्यान टॉवरवरच उभे राहून राजगिऱ्याचे लाडू व काही केळी खाऊन त्यांनी आषाढीचा फराळ केला.

वारकऱ्यांची सेवा ही खऱ्या अर्थाने पांडुरंगाची सेवा आहे, असे श्री. महाजन यांनी याप्रसंगी सर्वांना दाखवून दिले. राज्यातल्या वरिष्ठ मंत्र्यांपैकी एक असलेले परंतु कुठलाही बडेजाव न मिरवता सर्वसामान्य कार्यकर्त्याप्रमाणे नियोजनात सहभागी झाले याबद्दलचा कृतज्ञता भाव हा वारकऱ्यांच्या नजरेतून यावेळी स्पष्ट दिसत होता. पांडुरंग अशा सर्वसामान्य जनतेसाठी झटणाऱ्या जनसेवकाला दीर्घायुष्य प्रदान करो हीच प्रार्थना. राम कृष्ण हरी,

■ संदीप जाधव

# शिवरायांचे 12 किल्ले युनेस्कोच्या यादीत

## महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील जिंजीचा समावेश




**महाराष्ट्राच्या** सांस्कृतिक आणि सामरिक इतिहासात मानाचे स्थान असणारे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना जागतिक पटलावर मानाचे स्थान बहाल करण्यात आले आहे. युनेस्कोने रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी असे महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा बहाल केला आहे. या माध्यमातून महाराष्ट्राचा समृद्ध वारसा कायमस्वरुपी जागतिक पटलावर नोंदवला जाणे, हा महाराष्ट्र राज्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.

शत्रूच्या नजरेस थेट न पडणाऱ्या दरवाज्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना व किल्ल्यांचे माची स्थापत्य हा मराठा दुर्ग स्थापत्य शास्त्रातील महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. स्वराज्याचे रक्षण करणाऱ्या या किल्ल्यांवर आढळणारे माची स्थापत्य जगभरातील अन्य कोणत्याही किल्ल्यांच्या रचनेमध्ये दिसून येत नाही. माची रचनेस



अनेक वेळा तटबंदी, बुरुज,दरवाजे आणि खंदकांनी सुरक्षित केलेले असते. माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेचा आणि युद्धकौशल्याचा मुत्सद्दी नीतीने रचलेला भाग आहे. या वैशिष्ट्यपूर्ण, अद्वितीय वैश्विक मूल्यांमुळे या किल्ल्यांना 'जागतिक वारसा' म्हणून स्वीकारण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागअंतर्गत असणाऱ्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने पुढाकार घेऊन हा प्रस्ताव केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याकडे सादर केला. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व संस्कृती मंत्रालय यांच्याकडे संपूर्ण भारतातून सन २०२४-२५ या वर्षाकरिता ७ प्रस्ताव प्राप्त झाले होते. पैकी छाननीअंती एकूण ५ प्रस्ताव त्यांनी पंतप्रधान कार्यालयाकडे सादर केले. यामध्ये 'महाराष्ट्राची कातळ शिल्पे' व 'मराठा लष्करी स्थापत्य' हे प्रस्ताव होते. या ५ प्रस्तावातून मराठ्यांचे लष्करी स्थापत्य या प्रस्तावाची पंतप्रधान कार्यालयाद्वारे निवड करण्यात आली. 'युनेस्को'कडे पाठपुरावा करण्यासह देश-विदेशातून या प्रस्तावास नामांकन मिळावे, यासाठी प्रयत्न करण्याची सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाकडे तसेच राष्ट्रीय आणि देशोदेशीच्या राजदूतांशी संपर्क करून महाराष्ट्राच्या या किल्ल्यांना नामांकन मिळावे, यासाठी जागतिक स्तरावर पाठपुरावा केला.

महाराष्ट्र शासनाकडून प्रस्ताव सादर करताना, राजस्थानमधील किल्ल्यांना याच प्रकारे 'युनेस्को'चे नामांकन मिळवण्याकामी अनुभव असलेल्या वास्तुविशारद डॉ. शिखा जैन यांची महाराष्ट्र शासनाकडून सल्लागार म्हणून निवड करण्यात आली होती. तसेच महाराष्ट्राचे पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस मदन गर्गे यांनी संपूर्ण प्रक्रियेमध्ये पाठपुरावा केला. या एकत्रित प्रयत्नांतून हा प्रस्ताव साकार झाला. ■

## अभिमानाचा क्षण

**मला हे सांगताना अतिशय आनंद होतो की, संपूर्ण देशवासीयांचे आराध्यदैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्लेवैभव असलेले १२ किल्ले हे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले आहेत. सर्वप्रथम मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अतिशय मनापासून आभार मानतो. त्यांनी दिलेला पाठिंबा आणि केंद्र सरकारकडून सक्रिय सहभाग ही अत्यंत मोलाची बाब ठरली. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि संस्कृती मंत्रालयाने यात मोठी मदत केली. मी स्वतः विविध राजदूतांशी संपर्क केला. माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीही वेळोवेळी साथ दिली. माझे सहकारी मंत्री आशिष शेलार यांनी स्वतः जाऊन युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेतली. तेथे तांत्रिक सादरीकरण केले. माझ्या कार्यालयातील अपर मुख्य सचिव विकास खारगे तसेच भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल शर्मा आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे हेमंत दळवी त्यात सहभागी होते. अनेकांचे हातभार लागले आणि त्यातून देशभरातील शिवभक्तांसाठी आजचा आनंदाचा क्षण साकारला गेला आहे.**

**मी पुन:श्च महाराष्ट्रातील सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो.**

**■ देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# संघटनाशरण नेतृत्व

● केशव उपाध्ये, प्रदेश मुख्य प्रवक्ते

> सामान्य कार्यकर्त्यांत सहजपणे मिसळण्याचा स्वभावधर्म असलेल्या रवींद्र चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वात अत्यंत चाणाक्ष राजकीय व्यवस्थापन कौशल्य दडलेले आहे. संघटनेसाठी सर्वस्व देण्याची तयारी असल्यानेच त्यांचा सामान्य कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष असा यशस्वी प्रवास झाला आहे.




**महाराष्ट्राच्या** राजकारणात ठाणे जिल्ह्याला राजकीय वजन प्राप्त होत असल्याचा अलीकडच्या काळातील दुसरा प्रसंग नुकताच पाहायला मिळाला. डोंबिवलीकर रवींद्र चव्हाण यांची भाजप प्रदेशाध्यक्ष पदावर निवड झाल्याची घटना ठाणे जिल्ह्याचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारी आहे. ठाणे जिल्ह्याने भाजपच्या विचारधारेला आकार देणारे रामभाऊ कापसे, अशोकराव मोडक यांसारखे नेते दिले. मात्र यंदाच्या निवडणूक उत्सवाच्या वर्षात विचारधारेच्या सोबत शह-काटशहाच्या राजकारणात गनिमी कावा दाखवणारा चेहरा म्हणजे रवींद्र चव्हाण हेच आहेत. सामान्य कार्यकत्यांत सहजपणे मिसळण्याचा स्वभावधर्म असलेल्या चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वात अत्यंत चाणाक्ष राजकीय व्यवस्थापन कौशल्य दडलेले आहे. कल्याण-डोंबिवली पालिका निवडणूक असो, २०१७-१८ ची पालघर खासदारकीची पोटनिवडणूक असो की, गेल्या वर्षीच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतली सिंधुदुर्ग-रत्नागिरीतील लढत असो, रवींद्र चव्हाण हेच तिचे हुकुमी एक्का होते. प्रत्येक छोट्या-मोठ्या निवडणुकीत पक्षाच्या विजयासाठी कृष्णनीतीचा वापर करणारे चव्हाण कमालीचे वेगळे व्यक्तिमत्त्व आहे.

भाजप संघटनेचे महाराष्ट्रातील शीर्षस्थ नेतृत्व म्हणून रवींद्र चव्हाण यांना दिलेल्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या घटनेला अनेक पैलू आहेत. राज्याच्या बदललेल्या राजकीय, जातीय, सामाजिक आणि भौगोलिक घटकांशी ती थेट निगडित आहे. भटजी-शेटजीचा पक्ष म्हणून हिणवल्या गेलेल्या भाजपने वसंतराव भागवत यांच्या संकल्पनेतून ओबीसी समाजात स्थान मिळवले. असे असताना राज्यातील सत्तेचा अंमलदार समजला जाणारा मराठा समाज आता आतापर्यंत काही अपवाद वगळता भाजपपासून लांबच होता. रवींद्र चव्हाण यांच्या रूपाने मराठा समाजाचा चेहरा दिल्याने जातीय समीकरणात ते फिट्ट बसतात, असा तर्क काहींनी मांडला आहे, पण भाजपमध्ये असा विचार केला जात नाही. कार्यकर्त्यांची पक्षाशी असलेली निष्ठा, त्यांनी पक्षाकरिता दिलेले योगदान याचा प्रामुख्याने विचार करीत भाजपमध्ये नेतृत्वाची संधी दिली जाते. चव्हाण यांचे निवडणुकीच्या पटावर अत्यंत चलाखपणे मोहरे वापरण्याचे कसब कोकणातील राजकारण्यांनी अनुभवले असले तरी महाराष्ट्राला तसे अपरिचित आहेत, ही जमेची बाजू. डोंबिवलीसारख्या



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बालेकिल्ल्यातून त्यांच्या राजकारणाला सुरुवात झाली आहे. अध्यक्षपदाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर राज्य परिषदेच्या अधिवेशनात बोलताना चव्हाण यांनी केलेले वक्तव्य त्यांच्यालेखी पक्षसंघटनेला किती महत्त्व आहे याची कल्पना देणारे आहे. 'ज्या पक्षाने मला मोठे केले त्यासाठी वाट्टेल ते करण्याची आपली तयारी आहे. भाजप हीच माझी ओळख आहे', असे चव्हाण यांनी आपल्या भाषणात नमूद केले होते. कार्यकर्त्यांना नेत्याकडून ताकद हवी असते. निवडणुकीबरोबरच दैनंदिन धबडग्यातही कार्यकर्त्यांच्या हाकेला अर्ध्या रात्रीही प्रतिसाद देणारा नेता संघटनेला पुढे घेऊन जातो. अशी क्षमताही चव्हाण यांनी अनेकदा दाखविल्याने कार्यकर्त्यांमध्ये 'आपला रवी' अशी आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.

संघटनेसाठी सर्व काही समर्पण करण्याच्या अंगभूत वैशिष्ट्यामुळे गेल्या दशकात पक्षाने चव्हाण यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या. २०१६ मध्ये कोकण प्रभारी, नंतर २०२० मध्ये प्रदेश सरचिणीस, २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक यंत्रणा प्रमुख आणि आता प्रदेशाध्यक्ष. प्रत्येक वेळेस त्यांनी राज्य व केंद्रीय नेतृत्वाच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. यंदा राज्यात गावखेड्यापासून महापालिका निवडणुकांची मांदियाळी आहे. राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारची कामगिरी राज्यातील संघटनेच्या माध्यमातून जनतेसमोर न्यायची आहे, असे कार्यकर्त्यांना सांगत चव्हाण यांनी आपल्याला कार्यकर्त्यांकडून नेमके काय हवे आहे, हे स्पष्ट केले आहे. केंद्रातील आणि राज्यातील नेते अहोरात्र कष्ट करीत असूनही खोट्या प्रचाराचा फटका पक्षाला निवडणुकीत बसतो, याचे शल्य चव्हाण यांनी व्यक्त केले आहे. खोट्या प्रचाराचा सामना कार्यकर्त्यांना घरोघरी जाऊन करावा लागणार आहे याची त्यांना कल्पना आहे. आपल्यासमोरील आव्हान नेमके ठाऊक असल्याने त्याचा सामना कोणत्या पद्धतीने करावा लागेल, याचेही आकलन चव्हाण यांना आहे. निवडणुकीच्या युद्धातील व्यवस्थापन शांतपणे या कानाचे त्या कानाला न कळता कसे करायचे, याचे भान चव्हाण यांना आहे. त्याबरोबरच संघटना वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या डिजिटल तंत्रज्ञानाचा, याबरोबर येणाऱ्या सर्व तंत्र-मंत्राचा चव्हाण यांना परिचय आहे. त्याच बळावर ते आगामी सर्व निवडणुकांमध्ये पक्षाला विजयपथावर नेतील, याची खात्री आहे. ■

# ... म्हणून हवा विशेष जनसुरक्षा कायदा!

● प्रवीण दीक्षित, निवृत्त पोलीस महासंचालक

> १२ सप्टेंबर २००४ माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर आणि सीपीआय (एमएल) (पिपल्स वॉर) या दोन संघटनांचे विलिनीकरण झाले. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) चा जन्म झाला. अर्बन नक्षल संकल्पनेविषयी वेगवेगळे मतप्रवाह आहेत. पण, हा गैरसमज दूर करण्यासाठी प्रथम माओवादी साहित्याचा अभ्यास गरजेचा आहे. जेणेकरून याबद्दलचे सर्व गैरसमज आणि मनातील शंका सहज दूर होतील आणि जनसुरक्षा कायद्याचे महत्त्वही अधोरेखित होईल. यात विरोधी विचारांचा आवाज दडपण्याचा हेतू नाही, तर राष्ट्रविरोधी शक्तींच्या देशविघातक कृतींपासून देशाला वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.



### अर्बन नक्षल म्हणजे काय?

कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) पक्षाचे स्ट्रॅटेजी अ‍ॅण्ड टॅक्टीक्स ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन हे पुस्तक वेगवेगळ्या चकमकी दरम्यान जप्त करण्यात आले. ते आजही डिजिटल माध्यमातून उपलब्ध करुन दिले जाते. या पुस्तकाचा भाग-२, जो माओवाद्यांच्या कार्यनितीवर आधरित आहे, त्यातील प्रकरण क्रमांक १३ माओवाद्यांची शहरी भागातील कार्याची दिशा स्पष्ट करणारे आहे. यात माओवादी संघटनांनी ३ अस्त्रांना जादुई अस्त्र संबोधले आहे. ती म्हणजे पार्टी, संयुक्त मोर्चा आणि सैन्य. यातील संयुक्त मोर्चा (युनायटेड फ्रंट) हे सर्वाधिक प्रभावी आणि क्रांतिकारी अस्त्र म्हणून वापरले जाते. याचा मूळ उद्देश देशातील प्रस्थापित संवैधानिक व्यवस्थांविरुद्ध जनसमुदायाचा सहभाग. तो हेतू साध्य झाल्यानंतरच सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला जातो. यातील हा संयुक्त मोर्चा म्हणजेच, सोप्या भाषेत अर्बन नक्षल किंवा शहरी माओवादी.

### शहरी माओवादाची कार्यपध्दती

यात प्रामुख्याने विद्यार्थी, बेरोजगार युवा, परिपूर्ण विकास न झालेले लोक, महिला, जंगलात राहणारे नागरिक, भूमिहीन व गरीब शेतकरी अशा सामाजिक घटकांवर लक्ष केंद्रित केले जाते. यासाठी विषय निवडून कृती समिती, संप समिती, संघर्ष समिती, आंदोलनांची

आखणी केली जाते किंवा काही वाजवी आंदोलनांमध्ये शिरकाव / घुसखोरी केली जाते. आपल्या समस्या सशस्त्र क्रांतीशिवाय सुटूच शकत नाहीत, असे धडे दिले जातात आणि त्यातून गृहयुद्धासारखी परिस्थिती निर्माण केली जाते. एवढेच नाही तर सैन्य आणि अर्धसैन्य दलात त्यांची घुसखोरी करुन त्यांना घातपाती कार्यासाठी प्रवृत्त केले जाते. नक्षली चळवळीसाठी शस्त्र, दारुगोळा, औषधी, तांत्रिक मदत, दळणवळण यंत्रणा, इलेक्ट्रॉनिक साहित्य, प्रचार-प्रसार, नवीन नेतृत्त्वाची उभारणी आणि नवीन भरती इत्यादी कामे ही शहरी नक्षलवादाच्या माध्यमातून केली जातात.

उदाहरणच सांगायचे झाले, तर मिलिंद तेलतुंबडे हा यवतमाळ जिल्ह्यात वणी भागात एक तरुण युनियन नेता होता. तो वेस्टर्न कोलफिल्डसमध्ये कार्यरत होता. नक्षलींच्या सीसी सदस्यांनी त्याला बल्लारपूर परिसरात माओवादी विचारसरणीत अंतर्भूत केले. १९९८ मध्ये तो भूमिगत झाला आणि २००५ मध्ये सीसी सदस्य झाला. त्याने विदर्भातील तरुणांना मोठ्या प्रमाणात आपल्या जाळ्यात ओढले. सुदर्शन रामटेके हा सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याचा मुलगा. तो माओवादी चळवळीत सामिल झाला. प्रारंभी त्याने केंद्रीय समितीसाठी स्टेनो म्हणून काम केले. पण, सुदैवाने त्याचा चळवळीसंबंधीचा दृष्टिकोन स्पष्ट झाला आणि त्याने आत्मसमर्पण केले. राजऱ्यात शिवाजी महाविद्यालय आहे. तेथे देशभक्ती युवा मंचच्या माध्यमातून राजा ठाकूर हा माओवादाशी जोडला गेला. नंतर तो गडचिरोलीत एका चकमकीत मारला गेला. संतोष शेलार (चळवळीतील नाव – पेंटर), प्रशांत कांबळे (चळवळीतील नाव – लॅपटॉप) अशी कितीतरी उदाहरणे आहेत. ह्या कांबळेला नुकतीच ठाणे पोलिसांनी अटक केली. तो एका शाळेत दुपारचे जेवण बनवायचे काम करतो दाखवून आदिवासी मुलांना आपल्या जाळ्यात ओढत असे. पुण्यातील झोपडपट्टी परिसरात सांस्कृतिक आघाडीच्या नावाने असेच जाळे टाकण्यात आले. तरुणांना जाळ्यात ओढायचे आणि भीमाशंकरच्या जंगलात प्रशिक्षणासाठी घेऊन जायचे. नुकत्याच झालेल्या वारीतही अंधश्रद्धा निवारणाच्या नावाखाली वारकऱ्यांना गोंधळात टाकायचे उद्योग हे लोक करीत होते.

**कायद्याची गरज का?**



मुळात हे लक्षात घेतले पाहिजे की, आपला देश हा महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या राज्यघटनेच्या मजबुत पायावर उभा आहे आणि माओवाद नेमकी हीच राज्यघटना नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. बहुपक्षीय लोकशाही, निवडणुका, मतदानाचा अमूल्य अधिकार, विचारस्वातंत्र्य, प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य, न्यायव्यवस्था हे माओवाद्यांना मान्य नाहीत. सर्व फुटीर शक्ती एकत्र आणणे आणि त्यातून देशाच्या प्रगतीला बाधा आणणे, कायम अशांतता ठेवणे हेच त्यातून साध्य केले जाते. माओवादी फ्रंटल संघटनेची कार्यपद्धती वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीची आहे. सामाजिक संघटना, राजकीय पक्ष विरहित घटक आहेत, तेथे माओवादी हे जनसामान्यांमध्ये अस्तित्त्वात असलेल्या संवैधानिक यंत्रणा आणि एकूणच लोकशाही प्रक्रियेविरुद्ध रोष/असंतोष निर्माण करतात. असे गुन्हे हे युएपीए कायद्याच्या कक्षेत येत नाहीत. विविध न्यायालयांनी सुद्धा अशा घटनांचा युएपीए अंतर्गत मर्यादांवर बोट ठेवले आहे. त्यामुळेच अशाप्रकारचा स्वतंत्र कायदा ही राज्याची गरज आहे. त्यातून खऱ्या अर्थाने अशा घटनांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती हाताळण्यास मदतच होणार आहे.

मा. मुख्यमंत्री यांनी विधानसभेत जे निवेदन केले, त्यातही परिशिष्टातील उद्देश आणि कारणे यात स्पष्टपणे नमूद केले आहे की, हा कायदा माओवादी फ्रंटल संघटनांच्या क्रियाकल्पांवर ज्याचा उद्देश जनसामान्यांमध्ये संविधान आणि संवैधानिक व्यवस्थेविरोधात असंतोष निर्माण करणे आणि त्यातून सशस्त्र माओवादी विचारांचा प्रसार करणे हा आहे, त्याला पायबंद घालण्यासाठीच हा कायदा आहे. महाराष्ट्रातील एका दैनिकाने एका लेखात असे नमूद केले की, बेकायदेशीर कृत्याच्या व्याख्येत

एखाद्या व्यक्तीने एखादी कृती करुन, बोललेल्या किंवा लिखित किंवा चिन्हाद्वारे केलेल्या कृतीचाही समावेश कायद्यात आहे. परंतू, याठिकाणी आवर्जून हे सांगेन की, माओवाद्यांचा प्रचार–प्रसार करण्यात चेतना नाट्यमंच (ज्यावर छत्तीसगड सरकारने बंदी घातली आहे) या संघटनेचा मोठा वाटा आहे. आत्मसमर्पित नक्षल्यांच्या चैकशीतून हे उघड झाले की, ७० टक्के तरुण हे चेतना नाट्यमंचाच्या माओवादी क्रांती मंचाच्या नाटकातून, गाण्यांमधून माओवादाकडे आकर्षित झाले.

आता हा कायदा भारतीय संविधानाच्या कलम १९ च्या चौकटीत बसणारा आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य अमर्याद असलेच पाहिजे. पण, ज्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे सार्वजनिक सुरक्षा, सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येईल, त्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणता येणार नाही. आणि नक्षलवादात प्रामुख्याने निवडणुका, न्यायालय, विधीमंडळ अशा स्तंभांना जनसामान्यांमध्ये बदनाम करणे आणि त्यातून लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, हीच कार्यपद्धती आहे. या कायद्याची महाराष्ट्रात सर्वाधिक गरज का आहे? केंद्रीय गृहमंत्रालयाचा एक अहवाल आहे, ज्यात माओवादाचा प्रसार करणाऱ्या सर्वाधिक ६४ इतक्या फ्रंटल संघटना या महाराष्ट्रात आहेत. एकतर महाराष्ट्रात वेगाने होणारे शहरीकरण आणि दुसरीकडे जंगलांतील कारवायांमध्ये आलेले मोठे अपयश यामुळे नक्षलवादाचा मोठा प्रसार आता शहरांतून होतो आहे. गेल्या काही वर्षांत नक्षल्यांकडून जे साहित्य जप्त करण्यात आले, त्यातून आता पुढची लढाई ही शहरी युद्ध आणि शहरांमध्ये माओवादी संघटनांचा विस्तार याचे सज्जड पुरावे मिळालेले आहेत. माओवाद्यांच्या राष्ट्रीय स्तरावर कार्यरत केंद्रीय कार्यकारिणीत सुद्धा हे निर्णय झालेले आहेत.

### कायद्यातील संरक्षणात्मक तरतुदी

आंध्र आणि तेलंगणा राज्यात जंगलातील कारवायांमध्ये घट झाली. पण, त्या राज्यांनी किमान १२ ते १४ फ्रंटल संघटनांवर बंदी टाकली. कारण, तेथे सुद्धा शहरी नक्षलवाद मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. तिसरे राज्य छत्तीसगड जर यात जोडले तर किमान ४४८ संघटनांवर बंदी आहे. प्रामुख्याने सांस्कृतिक आघाडी, विद्यार्थी आघाडी, नागरिक हक्क समिती, वकील संघटना अशा नावाने संघटना काढून माओवादाच्या प्रसाराला हातभार लावला जातो. कारवाई झाली की, या संघटना स्वतःचा बचाव करायला जातात आणि मग सामाजिक कार्यकर्ते, मानवाधिकार कार्यकर्त्यांवर कारवाई झाली, असा अपप्रचार केला जातो. पण, वस्तुतः ते बंदी असलेल्या सीपीआय माओवादी संघटनेचे सदस्य असतात. त्यांचे प्रमुख लक्ष्य प्रदीर्घ युद्ध जिंकणे आणि २०४७ मध्ये लाल किल्ल्यावर सीपीआय माओवादीचा झेंडा फडकाविणे हा आहे.

केवळ आणि केवळ अशाच संघटनांसाठी हा कायदा आहे. कायदा व सुव्यवस्था हाताळताना ज्या तरतुदी अन्य कायद्यांमध्ये नाहीत, अशा तरतुदींचा हा कायदा आहे. या कायद्यावर जे विविध आक्षेप व्यक्त झाले, त्यांनी हा कायदा आधी समजून घेतला पाहिजे. त्यातील काही बाबी अशाः

**१) एखाद्या संघटनेवर बंदी घालायची असल्यास त्यासाठी सल्लागार मंडळाची तरतूद आहे. हे सल्लागार मंडळ न्यायालय नियुक्त करीत असते. त्यामुळे आपोआपच सरकार या कायद्याचा दुरुपयोग करु शकत नाही.**

**२) एखाद्या संघटनेवर बंदी घातल्यानंतर कारवाई करण्यासाठी किंवा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिस उपमहानिरीक्षक दर्जाच्याच अधिकाऱ्याची परवानगी अनिवार्य आहे.**

**३) आरोपपत्र दाखल करण्यासाठी अपर पोलिस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याची परवानगी आवश्यक आहे. या तरतुदींमुळे कनिष्ठ अधिकारी किंवा राजकीय दबावाचे आरोप नगण्य ठरतात.**

महाराष्ट्राने ४० वर्ष माओवादाशी जंगलात लढा दिला. पण, शहरी भागात ५० वर्षांपासून कार्यरत माओवादी संघटनांवर कोणतीही कार्यवाही केली नाही. परंतू अलिकडच्या काळात शहरी भागात नक्षलींचे जाळे मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्यावर कारवाई ही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ती वेळीच केली नाही, तर राज्याच्या सामाजिक व्यवस्थेसमोर गंभीर संकट निर्माण होऊ शकते. संविधान आणि लोकशाही न मानणाऱ्या माओवादी फ्रंटल संघटनांवर कारवाई हाच महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायद्याचा मुख्य गाभा आहे. विरोधकांनी ह्या विरुद्ध चालवलेली हाकाटी हा त्यांचा कुटील डाव आहे. ■

# 'सरकार आपल्या दारी' ची कल्पना प्रत्यक्षात आणणारा उपक्रम




> भारतीय जनता पार्टी हा कार्यकर्त्यांच्या बळावर, परिश्रमावर वाढलेला पक्ष आहे. पक्ष संघटनेचे काम करताना सामान्य कार्यकर्त्यांनी अतोनात मेहनत घ्यावी लागते तसेच अनेक अडचणींनी तोंड द्यावे लागते. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर भारतीय जनता पार्टीला केंद्रात आणि राज्यात सत्तेची संधी मिळाली आहे.

**भारतीय** जनसंघापासून आपला राजकीय प्रवास सुरू झाला. संघटना वाढीसाठी अनेक वर्षे मेहनत घेतल्याचे फळ आता मिळत आहे. आपल्या पक्षासाठी सत्ता हे सेवेचे साधन आहे. सरकार दरबारी सामान्य जनतेचे प्रश्न नेणे आणि ते सोडविणे ही मोठी जटील प्रक्रिया आहे. याचे कारण प्रशासनाची कार्यपध्दती वेळ खाऊ असते. सत्तेत नसताना आपल्या अनेक कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी विविध प्रश्नांसाठी, मागण्यांसाठी आंदोलने केली असतात, सरकार दरबारी खेटे घातलेले असतात. त्यामुळे आपल्या पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आपण मांडलेले प्रश्न, समस्या यांचे निराकरण व्हावे अशी सामान्य कार्यकर्त्यांची अपेक्षा असते. यासाठी सामान्य कार्यकर्ते पक्ष नेतृत्वाकडे आग्रह धरतात. आपण सत्ताधीरी पक्ष असलो तरी प्रशासनाकडून कामे करवून घेणे ही सोपी गोष्ट नसते. आपल्या सामान्य कार्यकर्त्यांना प्रशासनाच्या कार्यपध्दतीची माहिती नसते. आपल्या निवेदनावर मंत्र्याने आदेशात्मक सुचना देऊन सही केली म्हणजे आपले काम झाले या भ्रमात अनेक जण असतात. **यामुळे आपली कामे होत नाहीत अशा तक्रारी कार्यकर्त्यांकडून सुरू होतात. कार्यकर्त्यांच्या या तक्रारी दूर करण्यासाठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून जनता दरबारचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.** या उपक्रमाची



**आजपर्यंत झालेले ‘जनता दरबार’– २०**

**‘जनता दरबार’ मध्ये दाखल झालेल्या तक्रारी – सुमारे ८ हजार.**



जबाबदारी प्रदेश भाजपाचे मुख्य समन्वयक (शासकीय कामकाज) सुधीरभाऊ देऊळगावकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. सामान्य कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रदेश कार्यालयात पक्षाच्या केंद्रातील आणि राज्यातील मंत्र्यांचे जनता दरबार आयोजित केले जातात. या कार्यक्रमात संबंधित मंत्र्यांना आपल्या मागण्यांबाबत निवेदन देता येते. मंत्री हे निवेदन वाचून त्यावर काय कार्यवाही करायची याबाबतचे निर्देश देतात. या नंतरची प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची प्रकिया श्री. देऊळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश कार्यालयाच्या यंत्रणेतून पार पाडली जाते. पक्ष कार्यकर्त्यांबरोबरच सामान्य जनतेलाही या उपक्रमात आपले प्रश्न सोडवून घेण्याची संधी मिळते. पक्ष कार्यकर्त्यांना तसेत सामान्य माणसाला आपल्या कामासाठी मंत्र्यांना सहज भेटता येत नाही. त्यामुळेच पक्षाने हा उपक्रम सुरू केला आहे. तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून मंत्री म्हणजे सरकार तुमच्याकडे येईल, अशी यामागची कल्पना आहे.





श्री. देऊळगावकर यांनी सांगितले. या उपक्रमामुळे सामान्य कार्यकर्त्याला हे सरकार आपले आहे असे वाटले पाहीजे, असेही श्री. देऊळगावकर यांनी नमूद केले. कार्यकर्त्यांच्या, जनतेच्या निवेदनाचा पाठपुरावा करण्यासाठी श्री. देऊळगावकर हे जातीने लक्ष देतात. पक्ष कार्यालयात आलेला कार्यकर्ता नाराज होऊ नये, यासाठी सर्व काळजी या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेतली जाते. श्री. देऊळगावकर यांना प्रशासनाच्या कार्यपध्दतीचा अनुभव आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांशी कसा संपर्क करायचा याविषयीचे मार्गदर्शन श्री. देऊळगावकर यांच्याकडून केले जाते. वेळप्रसंगी श्री. देऊळगावकर हे संबंधित अधिकाऱ्यांशी स्वत:संपर्क साधतात. ■

'सरकार आपल्या दारी' ही कल्पना या उपक्रमातून प्रत्यक्षात येत आहे. सर्वांनाच आपल्या कामासाठी मुंबईला येणे शक्य नसते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आपले मंत्री या कार्यक्रमासाठी महिन्यातून दोन जिल्ह्यात जातात. जिल्हाध्यक्षांच्या समन्वयातून प्रदेश कार्यालयातून मंत्र्यांच्या दौऱ्याचे नियोजन केले जाते. जिल्हा कार्यालयात पक्ष कार्यकर्त्यांना तसेच सामान्य जनतेला भेटून त्यांच्या मागण्यांची, तक्रारींची निवेदने मंत्री महोदय स्वीकारतात. या उपक्रमासाठी आपल्या विचार परिवारातील संघटनांशी समन्वय ठेवला जातो. विचार परिवारातील कार्यकर्त्यांचे प्रश्नही या उपक्रमाच्या माध्यमातून प्राधान्याने सोडविले जातात. जिल्हा कार्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने पक्षाचे मंत्री ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या घरी जातात. त्याचबरोबर पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांसमवेत मंत्री स्नेहभोजनही घेतात. पक्षाच्या मंत्र्यांनी आपल्या कामाचा व्याप सांभाळून संघटनेसाठी वेळ दिला पाहिजे, या भावनेतून या कार्यक्रमाची रचना करण्यात आल्याचे

## कार्यकर्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करणार

### मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्षांची ग्वाही

**प्रदेश कार्यालयात काम, तक्रार, समस्या घेऊन आलेला कार्यकर्ता कोणत्याही परिस्थितीत नाराज होऊन जाऊ नये, त्याच्या तक्रारीची तड लागली गेलीच पाहिजे, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिल्या आहेत. कार्यकर्त्यांच्या व सामान्य जनतेच्या तक्रारींची तड लावण्यासाठी प्रदेश कार्यालयाने उभ्या केलेल्या रचनेला सर्वतोपरी मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.**

**'जनता दरबार'च्या उपक्रमाद्वारे कार्यकर्त्यांना तसेच सामान्य जनतेला मोठी मदत होत असून हा उपक्रम जिल्हा पातळीवरही यशस्वी ठरत असल्याचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले आहे.**

# स्वस्त आणि सुलभ आरोग्य सेवा

> सामान्य जनतेसाठी वैद्यकीय सेवांचे दर न परवडणारे आहेत, हे लक्षात घेऊन मोदी सरकारने आरोग्य क्षेत्रात मूलभूत बदल घडवण्यासाठी अनेक परिवर्तनकारी सुधारणा केल्या. जनऔषधी केंद्रातून मिळणारी परवडणारी औषधे असोत, डिजिटल आरोग्य असो, जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना असो किंवा वैद्यकीय जागांची संख्या वाढवणे असो, प्रत्येक क्षेत्रात गेल्या ११ वर्षांत जी कामे झाली आहेत, त्यांनी देशातील प्रत्येक वर्गासाठी परवडणाऱ्या आणि सुलभ आरोग्यसेवेचा मार्ग सोपा केला आहे.

### आरोग्य सेवेमुळे सुरक्षित झाले जीवन

■ युनायटेड नेशन एजन्सी ग्रुपने २५ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, २०२३ मध्ये बालमृत्यू दर (पाच वर्ष वयापर्यंत) प्रति हजारी २८ नोंदवला गेला, तर २०१५ मध्ये हा दर प्रति हजारी ४८ होता. या काळात देशात ४२ टक्के घट नोंदवली गेली, तर जागतिक पातळीवर ती १४ टक्के नोंदली गेली.



■ याच अहवालानुसार, २०२३ मध्ये देशात नवजात शिशु मृत्युदर प्रति हजारी १७ नोंदवला गेला, तर २०१५ मध्ये हा आकडा २८ होता. भारतात ३९ टक्के घट झाली, तर जागतिक स्तरावर ११ टक्के घट झाली.

### स्वस्त आणि दर्जेदार औषधे

■ प्रधानमंत्री भारतीय जन औषधी योजना (पीएमबीजेपी) अंतर्गत देशभरात १५ हजार ४७९ जन औषधी केंद्रे उघडण्यात आली. येथे जेनेरिक औषधे ८०% पर्यंत स्वस्त दरात उपलब्ध करुन दिली जात आहेत.

■ जन औषधी योजनेअंतर्गत, गेल्या १० वर्षांत नागरिकांना २५ हजार कोटी रुपयांची स्वस्त औषधे उपलब्ध करून देण्यात आली.

■ ३८ हजार कोटी रुपयांची बचत सामान्य लोकांनी केली.

### आयुष्मान भारत– प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (एबी– पीएमजय)




■ ८८ कोटी लाभार्थी, देशातील ४० टक्के लोकसंख्येला लाभ. प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी पाच लाख रूपयांपर्यंत आरोग्य विमा.

■ ९.१९ कोटी लोकांवर १ एप्रिल, २०२५ पर्यंत एबी–पीएमजयअंतर्गत मोफत औषधोपचार करण्यात आले. या औषधोपचारांसाठी सरकारचा १,२९,३८६.०६ कोटी रूपयांचा खर्च.

■ २९ ऑक्टोबर, २०२४ रोजी ७० वर्षापेक्षा वयाने

जास्त असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुष्मान वय वंदना योजनेचा प्रारंभ. यामध्ये पाच लाख रूपयांपर्यंत अतिरिक्त आरोग्य विमा दरवर्षी दिला जात आहे.

■ ७७.१९ कोटी लोकांचे युनिक हेल्थ आयडी, आयुष्मान भारत डिजिटल मिशन (एबीडीएम) अंतर्गत २८ एप्रिल, २०२५ पर्यंत तयार करण्यात आले आहे.

■ १,७६,८८७ आयुष्मान आरोग्य मंदिर (एएएम) कार्यरत. ३१ मार्च, २०२५ पर्यंत ३७७ कोटींपेक्षा जास्त लोकांवर औषधोपचार येथे करण्यात आले.

### लसीकरण



■ देशामध्ये ९४.१ टक्के मुलांचे शंभर टक्के लसीकरण केले जात आहे.

■ या औषधनिर्माण क्षेत्र: युनिसेफच्या वतीने संपूर्ण जगाला जितकी लस लागते, त्यापैकी जवळपास ५५ ते ६० टक्के लशीच्या आवश्यकतेची पूर्तता भारताकडून केली जाते. जगामध्ये सर्वात स्वस्त लस भारताची आहे.

■ भारताच्या औषधनिर्माण क्षेत्राच्या व्याप्तीचा विचार केला तर, जगामध्ये तिसरे सर्वात मोठे औषधनिर्माण क्षेत्र आहे.

■ भारत जगातला सर्वात मोठा जेनेरिक औषधे पुरवणारा देश आहे. संपूर्ण विश्वाची औषधाची २० टक्के गरज भारताकडून पूर्ण केली जाते.

### कर्करोग

■ ६४.७५ कोटींपेक्षा जास्त लोकांना मुखाचा कर्करोग, २९.५५ कोटींपेक्षा जास्त महिलांना स्तनाचा कर्करोग आणि १९.६९ कोटींपेक्षा जास्त महिलांना सर्व्हायकल म्हणजे गर्भाशयाच्यामुखाचा कर्करोग झाला असल्याचे, केलेल्या तपासणीमध्ये लक्षात आले आहे.

■ सर्व २२ नवीन एम्समध्ये कर्करोग या आजारावर औषधोपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे.

■ देशभरामध्ये २१७ अमृत औषधांच्या दुकानांमध्ये कर्करोगावरील २८९ प्रकारची औषधे बाजारमूल्यापेक्षा ५० टक्के स्वस्त दरामध्ये उपलब्ध आहेत. १६ कोटींपेक्षा जास्त लोकांनी या दुकानांतून औषधे खरेदी केली.

### राष्ट्रीय सिकल सेल रक्तक्षय निर्मुलन कार्यक्रम



■ ३१ मार्च २०२५ पर्यंत ५.२६ कोटी लोकांची तपासणी करण्यात आले. यासाठी जे लक्ष्य निश्चित केले, त्यापैकी ७५ टक्के तपासणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

### दुपटीपेक्षा जास्त झाली वैद्यकीय महाविद्यालये आणि वैद्यकीय जागा

| | २०१४ | २०२५ | वाढ |
|---|---|---|---|
| वैद्यकीय महाविद्यालये | ३८७ | ७८० | १०१.५५% |
| एमबीबीएसच्या जागा | ५१,९८५ | १,१८,१९० | १३०.१७% |
| पदव्युत्तर (पीजी) जागा | ३१,१८५ | ७४,३०६ | १३८.२७% |

### एका फोनवर कॉलवरून उपचार

■ ३७.१५ कोटी रुग्णांवर ई–संजीवनी टेलिमेडिसिनच्या माध्यमातून औषधोपचाराविषयी सल्ला–मार्गदर्शन करण्यात आले.



■ २२ नवीन एम्सना मंजुरी देण्यात आली. यामध्ये वर्ष २०१४ ते २०२४ या कालावधीमध्ये १५ एम्सचा समावेश. २२ पैकी १८ एम्सचे कामकाज सुरू. ■

# राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनने दोन महिन्यांत ग्राहकांना 7.14 कोटी रुपये परत मिळवून दिले

**राष्ट्रीय** ग्राहक हेल्पलाइनने गेल्या दोन महिन्यांमध्ये ग्राहकांना ७.१४ कोटी रुपये परत मिळवून देण्यात यश मिळवले आहे. प्रामुख्याने ३० क्षेत्रांमध्ये ही भरपाई करण्यात आली असून, ग्राहकांच्या परतावा दाव्यांशी संबंधित १५ हजार ४२६ तक्रारींचे निराकरण करण्यात आले.विशेष म्हणजे ई–कॉमर्स क्षेत्रात सर्वाधिक ८,९१९ तक्रारी नोंदवण्यात आल्या असून, त्याअनुषंगाने सर्वाधिक ३.६९ कोटी रुपयांचा परतावा मिळवून देण्यात आला. त्याखालोखाल ट्रॅव्हल ॲण टुरिझम (प्रवास आणि पर्यटन) क्षेत्राला ८१ लाख रुपयांचा परतावा मिळाला. ई–कॉमर्स परताव्याशी संबंधित तक्रारी देशभरातून आल्या, ज्यामध्ये सर्वाधिक (१२४२) उत्तर प्रदेशमधील होत्या, तर सिक्कीम आणि दादरा आणि नगर हवेलीसारख्या लहान प्रदेशांमधून देखील तक्रारी नोंदवल्या गेल्या. यामधून राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन हे खऱ्या अर्थाने देशव्यापी ग्राहक तक्रार निवारण व्यासपीठ असल्याचे स्पष्ट होते.

२५ एप्रिल ते ३० जून २०२५ दरम्यान ७.१४ कोटी रुपयांचा परत मिळवून देण्यात मिळालेले यश या हेल्पलाइनची कार्यक्षमता आणि प्रतिसाद देण्याची क्षमता दर्शवत असून, परिवर्तन भागीदारांचा विस्तार आणि भागधारकांचा भक्कम सहभाग, यामुळे हे शक्य झाले. यामधून वेळेवर, कोणत्याही त्रासाशिवाय तक्रार निवारण करण्यामधील या हेल्पलाइनची महत्त्वाची भूमिका, तसेच ग्राहक कल्याण आणि बाजारपेठेतील पारदर्शकता वाढवणारे एक विश्वासार्ह, खटलापूर्व व्यासपीठ म्हणून त्याचे महत्त्व



अधोरेखित होते. ग्राहकांना १९१५ या टोल फ्री क्रमांकावर १७ भाषांमध्ये आपल्या तक्रारी नोंदवता येतील. एकात्मिक तक्रार निवारण यंत्रणा (इनग्राम) असलेल्या ओमनी–चॅनेल, या आयटी–सक्षम केंद्रीय पोर्टलच्या माध्यमातूनही तक्रारी नोंदवता येतील. यासाठी ग्राहकांना लवचिकता आणि सुविधा देणारे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, ज्यामध्ये व्हॉट्सॲप (८८०००१९१५), एसएमएस (८८०००१९१५), एनसीएच ॲप, वेब पोर्टल (consumerhelpline.gov.in) आणि उमंग ॲप यांचा समावेश आहे.

विभागाने ग्राहक संरक्षण चौकट मजबूत करण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला असून सर्व ग्राहकांनी आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि तक्रारींचे वेळेवर निराकरण करून घेण्यासाठी हेल्पलाइनचा सक्रियपणे वापर करावा, असे आवाहन केले आहे.

**क्षेत्र–निहाय प्राप्त तक्रारींची संख्या आणि संबंधित परताव्याची रक्कम**

| अ.क्र. | क्षेत्र | एकूण तक्रारी | ग्राहकांना मिळालेली भरपाई |
|---|---|---|---|
| १ | ई–कॉमर्स | ८,९१९ | ३६,९५८,५४८ |
| २ | पर्यटन | १,०५७ | ८,१४१,११९ |
| ३ | सर्वसाधारण विमा | १०१ | ४,१४३,०४५ |
| ४ | एजन्सी सेवा | २६१ | ३,८४१,७५४ |
| ५ | विमान सेवा | १८६ | ३,०८६,८४८ |
| ६ | अन्य | ४,९०२ | १,५३,१८,९४२ |
| | एकूण | १०,३७३ | ७,१४,९०,२५६ |

# 153 देश भारतातून खेळणी आयात करत आहेत

**एकेकाळी** आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेला भारतातील खेळणी उद्योग आता देशांतर्गत उत्पादन करत आहे आणि १५३ देशांमध्ये निर्यात करत आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिल्ली येथे १६ व्या टॉय बिझ इंटरनॅशनल बी २ बी एक्स्पो २०२५ ला संबोधित करताना या उल्लेखनीय परिवर्तनावर प्रकाश टाकला. सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ, गुणवत्ता मानकांची अंमलबजावणी आणि स्थानिक उत्पादन समूहांचे बळकटीकरण यामुळे हा बदल शक्य झाल्याचे ते म्हणाले. गुणवत्ता नियंत्रण आदेशाच्या अंमलबजावणीमुळे भारताला गुणवत्तेबाबत जागरूक देश बनवण्यासाठी मदत झाली, तसेच देशांतर्गत खेळणी उत्पादक जागतिक मानकांची पूर्तता करण्यासाठी सक्षम बनले, असेही ते म्हणाले. भारताची १.४ अब्ज लोकसंख्या मोठी बंदिस्त बाजारपेठ उपलब्ध करून देते, ज्यामुळे उत्पादन वाढवण्यासाठी नैसर्गिक लाभ मिळतो. या मोठ्या प्रमाणामुळे, उद्योग कमी खर्चात अधिक उत्पादन क्षमता प्राप्त करू शकतो आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनू शकतो, असे ते म्हणाले. जागतिक बाजारपेठ काबीज करण्यासाठी उद्योगाने चांगले ब्रँडिंग, आकर्षक पॅकेजिंग आणि मजबूत उत्पादन डिझाइनवर लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे गोयल यांनी संगितले. या तिन्ही पैलूंना प्राधान्य दिले गेले, तर भारतीय खेळणी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक लोकप्रिय होऊ शकतील, असे ते म्हणाले. गोयल म्हणाले की, प्रधानमंत्री मुद्रा योजनेद्वारे खेळण्यांच्या नवोन्मेशी संकल्पना विकसित करणाऱ्या स्टार्टअप्सना लक्षणीय पाठिंबा मिळाला असून, त्याचा कालावधी आता २० वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. यामुळे छोट्या व्यावसायिकांना विनातारण कर्ज उपलब्ध झाले आहे, असे ते म्हणाले. ही प्रगती पुढे नेण्यासाठी सरकार खेळणी क्षेत्रासाठी एक नवीन प्रोत्साहन योजना आणण्याचा विचार करत आहे, असे केंद्रीय मंत्री म्हणाले. त्यांनी स्पष्ट केले की, ही योजना भारतीय खेळणी उत्पादकांना डिझाइन क्षमता वाढवून, दर्जेदार उत्पादन सुनिश्चित करून, पॅकेजिंग मजबूत करून आणि ब्रँड बिल्डिंगला पाठबळ देऊन जागतिक दर्जाचे बनायला सहाय्य करेल. नवोन्मेष, गुणवत्ता आणि बाजारपेठ



विकासावर सातत्याने लक्ष केंद्रित करत, भारताचा खेळणी उद्योग जागतिक बाजारपेठेत आघाडीची भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहे, असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला. ■

## भारताच्या सौर ऊर्जा क्षमतेत ४ हजार टक्के वाढ

**केंद्रीय** वाणिज्य आणि उद्योग मंत्री, पीयूष गोयल यांनी नवी दिल्ली येथे ११ व्या इंडिया भारत उर्जा साठवणूक सप्ताह २०२५ ला संबोधित केले. भारताच्या स्थापित सौर ऊर्जा क्षमतेत ४,०००% वाढ झाली आहे आणि देशाची अक्षय ऊर्जा क्षमता आता अतिशय भक्कम २२७ GW वर पोहोचली आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. पॅरिस करारानुसार आपले राष्ट्रीय निर्धारित योगदान पूर्ण करणारा भारत हा G20 देशांमधील कदाचित पहिला देश असेल, असे त्यांनी सांगितले. गोयल यांनी जम्मू-काश्मीरमधील पल्ली गावाचे उदाहरण दिले, जे गाव सौर ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमतेचा वापर करून भारताची पहिली कार्बन-न्यूट्रल पंचायत बनले आहे. देशाची सौर फोटोव्होल्टिक मॉड्यूल क्षमता जवळजवळ ३८-पट वाढली आहे, तर फोटोव्होल्टिक सेल क्षमतेत २१-पट वाढ झाली आहे. त्यांनी पीएम सूर्य घर योजनेचाही उल्लेख केला, जिचे १ कोटी घरांना छतावरील सौर पॅनेल बसवून त्यांना ऊर्जा आत्मनिर्भर करणे आणि विजेची बिले कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. भारत ऊर्जा स्वयंपूर्ण होण्याच्या एका केंद्रित मार्गावर आहे. देशाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी, चोवीस तास अक्षय ऊर्जा स्रोतांद्वारे देशाला ऊर्जा पुरवण्याचा भारताचा उद्देश आहे. ■

# तुकडेबंदी कायदा शिथील

## शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार

**महसूलमंत्री** चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यात तुकडेबंदी कायदा रद्द करण्याची मोठी घोषणा विधानसभेत केली आहे. या निर्णयाने राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्यातील महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४७ नुसार ठराविक प्रमाणात कमी क्षेत्रफळ असलेल्या जमिनींची खरेदी–विक्री कायद्याने प्रतिबंधित होती. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाणपासून २०० मीटरपर्यंत आणि विविध प्राधिकरणांमधील भागात झालेले सर्व तुकड्यांचे व्यवहार मान्य करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे एक गुंठेपर्यंत जमिन व्यवहारासाठी तुकडेबंदी कायदा रद्द केला जाईल, अशी घोषणा श्री. बावनकुळे यांनी केली आहे. राज्य शासनाने ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अकोला आणि रायगड जिल्हे वगळता राज्यातील इतर ३२ जिल्ह्यांमध्ये स्थानिक क्षेत्र घोषित करून बागायतीसाठी १० आर आणि जिरायतीसाठी २० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र निश्चित केले आहे. यामध्ये महानगरपालिका व नगरपरिषदा हद्दीतील क्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला नाही. धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत १९४७ च्या कायद्यातील कलम ७, ८ व ८अ नुसार स्थानिक क्षेत्रामध्ये जमिनीचे तुकडे निर्माण होणार नाहीत, अशा पद्धतीनेच हस्तांतरण करता येते. मात्र, १ जानेवारी २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार विशेष नियोजन प्राधिकरण किंवा नगरविकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या, तसेच प्रादेशिक योजनेत अकृषिक वापरासाठी निश्चित केलेल्या जमिनी या कायद्याच्या तुकडेबंदीच्या नियमांपासून वगळण्यात आलेल्या आहेत. तुकडेबंदी कायद्यामुळे अनेक व्यवहार प्रलंबित होते. नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. हा कायदा रद्द केल्यामुळे कमी क्षेत्राची खरेदी–विक्री करता येणार आहे. खरंतर आता तुकडाबंदी कायदा रद्द झाल्यामुळे शहरी भागात १ गुंठा जागा खरेदी आणि विक्री करण्याची मुभा मिळणार आहे. तर हा कायदा रद्द केल्याने तब्बल ५० लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. ■

# ई-ड्राईव्ह योजनेमध्ये इलेक्ट्रिक ट्रकचा समावेश

**देशात** इलेक्ट्रिक ट्रकच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने पीएम ई–ड्राइव्ह योजनेअंतर्गत एक नवीन उपक्रम जाहीर केला आहे. आता या योजनेत इलेक्ट्रिक ट्रकचाही समावेश करण्यात आला आहे. या योजने अंतर्गत ई–ट्रकसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केली जाईल, असे केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एचडी कुमारस्वामी यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत एन २ आणि एन ३ श्रेणीतील इलेक्ट्रिक ट्रकना प्रोत्साहन दिले जाईल. एन ३ श्रेणीतील ट्रॅक्टर–पुलर वाहनांसाठी विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत ट्रक उत्पादकांना वाहन–मोटरवर ५ वर्षे किंवा ५ लाख किलोमीटरची वॉरंटी आणि २.५ लाख किलोमीटर किंवा ५ वर्षांची वॉरंटी द्यावी लागेल. प्रोत्साहनाची रक्कम ट्रकच्या एकूण वजनावर अवलंबून असेल, ज्यामध्ये जास्तीत जास्त ९.६ लाख रुपयांपर्यंत मदत दिली जाऊ शकते. ही मदत थेट वाहनाच्या खरेदी किमतीत कपात करण्याच्या स्वरूपात दिली जाईल आणि उत्पादक कंपन्यांना पीएम ई–ड्राइव्ह पोर्टलवरून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर परतफेड केली जाईल. या योजनेचा वापर केवळ वाहतूक खर्च कमी करण्यासाठीच नाही तर अवजड वाहन क्षेत्राला स्वच्छ ऊर्जेकडे वळवण्यास मदत करण्यासाठी, ज्यामुळे हवेची गुणवत्ता सुधारेल आणि भारताच्या २०७० च्या निव्वळ–शून्य उद्दिष्टाला पाठिंबा मिळेल, असा सरकारचा उद्देश आहे. सेलने पुढील दोन वर्षांत १५० ई–ट्रक खरेदी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे आणि त्यांच्या अंतर्गत धोरणाचा भाग म्हणून त्यांच्या वाहनांच्या ताफ्यातील १५ टक्के इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतरित करण्याची योजना आहे. तथापि जुने प्रदूषण करणारे ट्रक स्क्रॅप करणे बंधनकारक असेल तरच ई–ट्रकवर प्रोत्साहन उपलब्ध होईल. या योजनेचा सुमारे ५,६०० इलेक्ट्रिक ट्रकना फायदा होण्याची शक्यता आहे. दिल्लीसाठी १,१००ई–ट्रकचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, ज्यामुळे राष्ट्रीय राजधानीची हवा गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल. सिमेंट, बंदर, स्टील आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रांना या योजनेचा फायदा होईल. ■





शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या यादीत समाविष्ट झाल्याबद्दल मुंबईत जल्लोष करण्यात आला. सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनीही छत्रपती शिवरायांना अभिवादन केले.





मालवण नगरपालिका क्षेत्रातील उबाठा गटाचे माजी तालुकाप्रमुख व माजी बांधकाम सभापती मंदार केणी, माजी बांधकाम सभापती व माजी नगरसेवक यतीन खोत, माजी आरोग्य सभापती व माजी नगरसेविका दर्शनाई कासवकर, शाखाप्रमुख भाई कासवकर, उपशहर प्रमुख नंदा सारंग, शाखाप्रमुख नितीन पवार, शाखाप्रमुख सई वाघ, युवा सेनेचे उपशहर प्रमुख अमन घोडावले, शाखाप्रमुख संजय कासवकर, माजी नगरसेविका सेजल परब, अशोक कासवकर यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत आदी.



कोल्हापूरचे माजी नगरसेवक दिलीप पोवार, उत्तम कोराणे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खा. धनंजय महाडिक, आ. अमल महाडिक, आ. सुधीर गाडगीळ, प्रा. जयंत पाटील, मुरलीधर जाधव, विश्वराज महाडिक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



सिंधुदुर्ग– २५ ज्येष्ठ वारकऱ्यांचा सत्कार– उपस्थिती– जिल्हा उपाध्यक्ष प्रसन्ना देसाई, ॲड. सुषमा खानोलकर, तालुकाध्यक्ष विष्णु परब, सुहास गवंडळकर, साईप्रसाद नाईक, सुजाता पडवळ, श्रेया मयेकर, रसिका मठकर, अभिषेक वेंगुर्लेकर, वैभव होडावडेकर, हेमंत गावडे, मनोहर तांडेल, हितेश धुरी, सत्यविजय गावडे, रविंद्र शिरसाठ, प्रमोद गोळम, अरुण ठाकुर, प्रभाकर गावडे, भाऊ केरकर, कृष्णा पेडणेकर.

# गुरुपौर्णिमा उत्सव





नांदेड येथील हनुमान गढ येथील महंत गुरूदास त्यागी महाराज, बालाजी मंदिर गाडीपुरा येथील वेकटेशाचार्य महाराज, बनारस येथील पंडित मदन महाराज यांचे आशीर्वाद घेताना ज्येष्ठ नेते प्रविण साले.



भागवत परिवाराचे गुरु श्री अरविंद महाराज गोंदीकर यांचे आशीर्वाद घेताना भागवत परिवाराचे दिनेश डहाळे, डॉ स्वप्नील बी. मंत्री मुख्य प्रदेश प्रवक्ता तथा प्रदेश समन्वयक भाजपा चिकित्सा प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश, डॉ. सुप्रिया मंत्री, सौ. डहाळे आदी.



रिधोरा येथील पांडे महाराज, मांगते महाराज व ह भ प नरिंगे महाराज यांचे आशीर्वाद घेताना संतोष शिवरकर, किशोर कुचके, विलास पोटे, संजय अघडते, गजानन ढवळे, रेठे, विपुल पाटील, रमेश पाटील, अनंत हरणे, उज्वल ठाकरे, अनंत मांगटे, पुंडे, वानखडे ग्रामपंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.





अहिल्यानगर- कुंदन ऋषी महाराज, आलोक ऋषी महाराज, साध्वी अनुपमा आदींचा सत्कार- उपस्थिती- जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, गोपाल वर्मा, सुनील रामदासी, ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत लोढा, बाळासाहेब गायकवाड, कमलेश भंडारी, अभय बोरा आदी.





प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची नुकतीच भेट घेतली.



शिख समाजाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा सत्कार– उपस्थिती– केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री मनजिंदर सिंग सिरसा, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅप्पी सिंग, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक, पोहरादेवीचे गुरु महाराज तसेच बंजारा समाजाचे महंत आदी मान्यवर उपस्थित होते.



वसई येथील युवा नेते गणेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली २५० कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे आदी.



नाशिक शहरातील शिवसेना उबाठा गटामधील उपजिल्हा प्रमुख व माजी नगरसेवक सचिन मराठे, माजी नगरसेवक व नामको बँकचे संचालक प्रशांत दिवे, माजी नगरसेविका डॉ. सीमा ताजणे, माजी नगरसेवक कमलेश बोडके, उपजिल्हा प्रमुख कन्नू ताजणे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे गणेश गिते यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. राहुल ढिकले, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, बाळासाहेब सानप, सुधाकर बडगुजर, लक्ष्मण सावजी, विजय साने आदी.



सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील नागरी संघटनेचे कन्हैयालाल देवी, दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक रामदास झोळ, उबाठा गटाचे सूर्यकांत पाटील यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, रश्मी बागल आदी.



लातूर जिल्ह्यातील चाकूर नगरपंचायतीचे माजी अध्यक्ष व प्रहारचे नेते कपील माकणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद पवार गटाचे निळकंठ मिरकले यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष खा.डॉ.अजित गोपछडे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. संभाजी पाटील-निलंगेकर, अर्चना पाटील-चाकुरकर, मराठवाडा विभागीय संघटनमंत्री संजय कोडगे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com